३९८

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

### सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१

# महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२

( दिनांक ३१ जानेवारी १९९० पर्यंत सुधारित )

### Maharashtra Act No. XXXI of 1982

# The Maharashtra Prevention of Malpractices of University, Board and Other Specified Examinations Act, 1982

( As modified upto 31st January 1990 )

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रु. ४.२० ]

वि (एच) ७३७

# महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२

## अनुक्रमणिका


| | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| | उद्देशिका | .. | |
| | कलमे | .. | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | १ |
| ३. | प्राश्निकांची कर्तव्ये व उल्लंघनाबद्दल शिक्षा. | .. | २ |
| ४. | प्रश्नपत्रिका छापणे, इत्यादी काम सोपवलेल्या व्यक्तींची कर्तव्ये व उल्लंघनाबद्दल शिक्षा. | | २ |
| ५. | प्रश्नपत्रिका स्वाधीन करण्यात आलेल्या व्यक्तींची कर्तव्ये व उल्लंघनाबद्दल शिक्षा. | | २ |
| ६. | परीक्षा घेतली जाण्यापूर्वी कोणतीही प्रश्नपत्रिका पुरविण्यास किंवा ती प्रसिद्ध करण्यास मनाई. | | २ |
| ७. | परीक्षेच्या वेळी कॉपी करण्यास आणि तोतयेगिरी करण्यास मनाई. | .. | ३ |
| ८. | अपराधांना अपप्रेरणा दिल्याबद्दल शिक्षा. | .. | ३ |
| ९. | अपराध दखलपात्र व बिनजामिनी असणे. | .. | ३ |
| १०. | अपराधांची संक्षिप्तरीत्या न्यायचौकशी करणे. | .. | ३ |
| ११. | सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश ४ याचे निरसन व व्यावृत्ती. | .. | ३ |

# सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१[1]

[महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२]

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्र, सर्वसाधारण भाग-४ मध्ये दिनांक ११ ऑक्टोबर १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** कोणतेही विद्यापीठ किंवा मंडळ किंवा राज्य शासनाकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येणारे इतर कोणतेही प्राधिकरण यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या किंवा घेण्याचे प्रस्तावित केलेल्या परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना, प्रश्नपत्रिका फुटणे किंवा अशा परीक्षांमध्ये कॉपी केली जाणे यांसह–प्रतिबंध करणे आणि त्याच्याशी संबंधित बाबी यांची तरतूद करण्यासाठी या राज्यात एक खास कायदा करण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले होते, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झालेली होती, आणि म्हणून, त्यांनी, २५ मे, १९८२ रोजी महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबत अध्यादेश, १९८२ प्रख्यापित केला होता ;

**१९८२ चा महा. अध्या. ४.**

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल.

(२) तो, २५ मे, १९८२ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

**१९६५ चा महा. ४१.**

(क) "मंडळ" याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा त्याच्या विभागीय मंडळापैकी कोणतेही मंडळ असा आहे ;

(ख) "परीक्षा" याचा अर्थ, कोणतेही विद्यापीठ किंवा मंडळ यांच्यामार्फत घेण्यात येणारी किंवा घेण्याचे प्रस्तावित केलेली कोणतीही परीक्षा असा आहे आणि त्यात, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा इतर प्राधिकरणामार्फत, घेण्यात येणाऱ्या किंवा घेण्याचे प्रस्तावित केलेल्या अन्य परीक्षेचाही समावेश होईल ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-५, दिनांक १४ ऑक्टोबर १९८२ चे पृष्ठ २८२ पहा.

(ग) "विद्यापीठ" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यात कायद्याने स्थापन झालेले कोणतेही विद्यापीठ असा आहे.

**प्राश्निकांची कर्तव्ये व उल्लंघनाबद्दल शिक्षा.**

३. (१) कोणत्याही परीक्षेस प्राश्निक म्हणून नेमलेली कोणतीही व्यक्ती, तिच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याने याबाबतीत तिला दिलेल्या लेखी अनुदेशानुसार असेल ते खेरीजकरून, तिने काढलेली प्रश्नत्रिका किंवा तिची प्रत कोणत्याही व्यक्तीला पुरवणार नाही किंवा पुरवण्याची व्यवस्था करणार नाही किंवा अशा प्रश्नपत्रिकेतील मजकूर कोणत्याही व्यक्तीला कळणार नाही किंवा त्याला कोणत्याही रीतीने प्रसिद्धी देणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**प्रश्नपत्रिका छापणे, इत्यादी काम सोपवलेल्या व्यक्तींची कर्तव्ये व उल्लंघनाबद्दल शिक्षा.**

४. (१) कोणत्याही परीक्षेच्या प्रयोजनासाठी काढलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिकेची छपाई, चक्रमुद्रण, टंकलेखन किंवा अन्य प्रकारे त्याच्या प्रती काढणे हे काम सोपवण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, तिच्यावर ते काम सोपवणाऱ्या प्राधिकाऱ्याने तिला दिलेल्या लेखी अनुदेशांनुसार असेल ते खेरीजकरून, प्रश्नपत्रिकेची प्रत, कोणत्याही व्यक्तीस देणार नाही किंवा देण्याची व्यवस्था करणार नाही किंवा त्यातील मजकूर कोणत्याही व्यक्तीस कळवणार नाही किंवा त्यास कोणत्याही प्रकारे प्रसिद्धी देणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**प्रश्नपत्रिका स्वाधीन करण्यात आलेल्या व्यक्तींची कर्तव्ये व उल्लंघनाबद्दल शिक्षा.**

५. (१) कोणत्याही परीक्षेच्या प्रयोजनांसाठी काढलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिका जिच्या स्वाधीन करण्यात आल्या आहेत किंवा अन्य कोणत्याही प्रकारे प्रश्नपत्रिका जिच्या ताब्यात आहेत अशी कोणतीही व्यक्ती, उक्त प्रश्नपत्रिका स्वाधीन करणाऱ्या प्राधिकाऱ्याने तिला दिलेल्या लेखी अनुदेशांनुसार असेल ते खेरीजकरून, प्रश्नपत्रिकेची कोणतीही प्रत, कोणत्याही व्यक्तीस पुरवणार किंवा वाटणार नाही किंवा पुरवण्याची किंवा वाटण्याची व्यवस्था करणार नाही किंवा त्यातील मजकूर कोणत्याही व्यक्तीला कळवणार नाही किंवा त्याला कोणत्याही प्रकारे प्रसिद्धी देणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**परीक्षा घेतली जाण्यापूर्वी कोणतीही प्रश्नपत्रिका पुरविण्यास किंवा ती प्रसिद्ध करण्यास मनाई.**

६. विद्यापीठाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने, मंडळाने किंवा परीक्षेशी संबंधित असलेल्या अन्य प्राधिकाऱ्याने, परीक्षा घेतली जाण्यापूर्वी, कोणत्याही वेळी दिलेल्या लेखी अनुदेशांनुसार असेल ते खेरीजकरून, कोणत्याही परीक्षेसाठी काढलेली किंवा काढल्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही प्रश्नपत्रिका जिच्या ताब्यात असेल अशी कोणतीही व्यक्ती, उक्त प्रश्नपत्रिका कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मोबदल्यादाखल किंवा अन्यथा पुरवील किंवा पुरविण्याची व्यवस्था करील किंवा तिची प्रत पुरविण्याची तयारी दर्शवील किंवा त्यातील मजकूर कळवील किंवा कळविण्याची तयारी दर्शवील किंवा कोणत्याही प्रकारे, त्यातील मजकुरास प्रसिद्धी देईल तर, उक्त व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर, एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

७. समवेक्षकास किंवा परीक्षेच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीस, जी कोणतीही व्यक्ती परीक्षा दालनात किंवा त्याच्या आसपास, परीक्षेसाठी काढलेल्या प्रश्नपत्रिकेच्या उत्तरांची कोणत्याही पुस्तकातून, टिप्पण्या (नोटस्) वरून किंवा अन्य उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांमधून कॉपी करीत असल्याचे किंवा इतर कोणत्याही उमेदवाराऐवजी परीक्षेस बसली असल्याचे किंवा अन्य कोणत्याही अनुचित मार्गाचा अवलंब करीत असल्याचे आढळून येईल त्या व्यक्तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील. **परीक्षेच्या वेळी कॉपी करण्यास आणि तोतयेगिरी करण्यास मनाई.**

८. जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधास अपप्रेरणा देईल तिला, त्या अपराधाकरिता ज्या शिक्षेची तरतूद करण्यात आली असेल ती शिक्षा होईल. **अपराधांना अपप्रेरणा दिल्याबद्दल शिक्षा.**

१९७४ चा २. ९. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील सर्व अपराध हे दखलपात्र व बिनजामिनी असतील. **अपराध दखलपात्र व बिनजामिनी असणे.**

१९७४ चा २. १०. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील सर्व अपराधांची कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याकडून किंवा कोणत्याही प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याकडून संक्षिप्तरीत्या न्यायचौकशी करण्यात येईल आणि उक्त संहितेची कलमे २६२ व २६५ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी शक्य होईल तेथवर, अशा न्यायचौकशीस लागू होतील ; **अपराधांची संक्षिप्तरीत्या न्यायचौकशी करणे.**

परंतु, या कलमाखालील संक्षिप्त न्यायचौकशीत कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आल्याच्या प्रकरणी, दंडाधिकाऱ्याने, या अधिनियमाखाली अशा अपराधासाठी ज्या कोणत्याही मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद असेल त्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा देणे, हे विधिसंमत असेल.

१९८२ चा महा. अध्या. ४. ११. (१) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांस प्रतिबंध करण्याबाबत अध्यादेश, १९८२ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश ४ याचे निरसन व व्यावृत्ती.**

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेसह) ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार केलेली (गोष्ट) किंवा काढलेली (अधिसूचना) आहे, असे समजण्यात येईल.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.

वि (एच) ७३७-२